
# १०. ओळख भारताची

## नकाशाशी मैत्री



खाली दिलेला भारताचा नकाशा पहा. या नकाशात भारतातील विविध नद्या दाखवल्या आहेत. यांपैकी काही नद्यांची नावे आपण नेहमी ऐकतो किंवा वाचतो. विविध देशभक्तीपर गीतांतही त्यांचा उल्लेख आहे. विविध नद्या, पर्वत व पठारे यांनी आपला देश समृद्ध आहे. यांपैकी काहींची नावे नकाशात दिली आहेत. सांगा बरें, नकाशात दिलेल्या नावांपैकी कोणती नावे तुमच्या परिचयाची आहेत ? ती कोठे वाचनात आली आहेत त्याचा विचार करा. नकाशामधील या नावांना ◯ करा.






**भारत–प्राकृतिक नकाशाचा काळजीपूर्वक अभ्यास करून खालील प्रश्नांची उत्तरे वहीत लिहा.**

(१) पर्वत शोधा व त्यांची नावे लिहा.

(२) नकाशातील डोंगरांची नावे लिहा.

(३) नकाशातील पठारे शोधा व त्यांची नावे लिहा.

(४) हिमालयात उगम पावून सिंधू नदीस येऊन मिळणाऱ्या नद्यांची नावे लिहा. उंचीचा विचार करून त्यांची वाहण्याची दिशा कोणती ते लिहा.

(५) कोरोमंडल किनाऱ्याला जाऊन मिळणाऱ्या प्रमुख नद्यांची नावे लिहा.

(६) गंगा, नर्मदा, वैनगंगा, गोदावरी आणि कावेरी या नद्यांच्या प्रवाहमार्गांचे निरीक्षण करा. त्यांच्या खोऱ्यातील जमिनीचा उतार कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे आहे ते नोंदवा.

(७) नकाशातील सरोवरे शोधा व नावे लिहा.
(८) आखातांची नावे शोधा व ती भारताच्या कोणत्या दिशेला आहेत ते नावांसह लिहा.
(९) भारताच्या तीनही बाजूंस असलेल्या जलभागाचे निरीक्षण करा. त्यांची नावे शोधून ते कोणत्या दिशेस आहेत ते लिहा.
(१०) लक्षद्‌वीप, अंदमान आणि निकोबार हे बेटांचे समूह शोधून त्यांतील काही बेटांची नावे लिहा.
(११) उत्तरेकडील मैदानी प्रदेशात कोणत्या प्रमुख नदीचे खोरे आहे ?

आपण नकाशा आणि त्यावर आधारित प्रश्नांद्‌वारे भारताच्या प्राकृतिक रचनेची माहिती जाणून घेतली.

आपला देश विविध नद्या, पर्वत, पठारे, मैदाने, बेटे इत्यादींनी नटलेला आहे. भारतीय भूखंडाच्या तीन दिशांना पाण्याने व्यापलेल्या व दक्षिणेकडे निमुळत्या होत जाणाऱ्या भागास 'भारतीय द्‌वीपकल्प' म्हणतात. आपली उत्तरेकडील सीमा हिमालयासारख्या अतिउंच पर्वतरांगांनी तयार झाली आहे. आपल्या देशात वने, मैदाने, वाळवंटे इत्यादी, आहेत. सोबतची चित्रे पहा.

आपल्या देशाचा विस्तार मोठा आहे. शिवाय समुद्रसपाटीपासून उंचीतील फरक ८००० मीटरपेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रदेशांनुसार भारताच्या हवामानात विविधता आढळते. हवामानातील या विविधतेमुळे वनस्पती, प्राणी व पक्ष्यांमधील विविधतासुद्‌धा मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. तसेच पीकपाण्यातही विविधता आढळून येते. जसे, उत्तर भारतात गहू हे प्रमुख पीक आहे, तर किनारपट्टीचा प्रदेश व दक्षिण भारतात भात हे प्रमुख पीक आहे. मध्यभारतात ज्वारीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते.

या सर्व विविधतेचा सर्वांगीण परिणाम आपले जीवनमान, चालीरीती, परंपरा, लोकजीवन व संस्कृतीवर झालेला आढळतो.

आपल्या देशात विविध जाती, जमाती व धर्मांचे लोक राहतात. विविध भाषा बोलल्या जातात. प्रदेशानुसार आहारात, पेहरावात, सण-उत्सव, इत्यादींमध्ये आपण ही विविधता सहज पाहू शकतो.


















वर दिलेल्या भारताच्या राजकीय नकाशाचे निरीक्षण करा व खालील प्रश्नांची उत्तरे वहीत नोंदवा.

१. आपले राज्य ओळखा. तुमच्या आवडत्या रंगाने ते रंगवा व राजधानीचे नाव लिहा.

२. सर्वांत उत्तरेकडे असणारे राज्य कोणते ते लिहा?

३. सर्वांत दक्षिणेला असणाऱ्या राज्याचे नाव लिहा.

४. अतिपूर्वेकडील राज्ये वेगवेगळ्या रंगाने रंगवा. त्यांची नावे व राजधान्या कोणत्या ते लिहा.

५. आकारमानाने मोठे असणारे राज्य पिवळ्या रंगाने रंगवा व राजधानीला ○ करा.

६. लाल अक्षरांनी लिहिलेली नावे कोणते क्षेत्र दाखवतात?

भारत हे लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र आहे. दिल्ली ही भारताची राजधानी आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने राजस्थान हे भारतातील सर्वांत मोठे राज्य आहे. त्यानंतर मध्यप्रदेश व तिसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र राज्य आहे. गोवा हे भारतातील सर्वांत कमी क्षेत्रफळ असलेले राज्य आहे.

### करून पहा.

वर्गातील विद्यार्थ्यांनी प्रत्येकी एक-एक राज्य निवडा. निवडलेल्या राज्याची माहिती खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे मिळवा.

(१) सामाजिक/सांस्कृतिक वैशिष्ट्ये : भाषा, सण, उत्सव, पेहराव, नृत्यप्रकार.

(२) भौगोलिक वैशिष्ट्ये : भूरूपे, जलरूपे, वने.

ही माहिती मिळवण्यासाठी तुम्ही शाळेचे ग्रंथालय, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, दूरदर्शन व शिक्षकांची मदत घ्या.

### जरा डोके चालवा.

१) आपल्या राज्याच्या शेजारील आणि २०१४ साली नव्याने तयार झालेले राज्य कोणते?

२) भारतातील एकूण राज्ये किती?

३) भारतीय महावाळवंट प्रामुख्याने कोणत्या राज्यात येते?

आता तुम्ही संकलित केलेल्या प्रत्येक राज्यांच्या वैशिष्ट्यांचे तक्ते तयार करून ते वर्गात चिकटवा. हे करत असताना संघराज्य क्षेत्रे विसरू नका. अशा प्रकारे तुमची विविध राज्यांच्या वैशिष्ट्यांनी युक्त अशी वर्गखोली तयार होईल.


भारतातील विविध प्रदेशांनुसार पिकांच्या उत्पादनातही आपल्याला फरक आढळतो. बाजारात किंवा दुकानात आपल्याला मिळणाऱ्या चहा, कॉफी, संत्री, आंबे इत्यादी वस्तू नेमक्या कोठे उत्पादित होतात, त्या आपल्यापर्यंत कशा पोहोचतात हे आपण पुढील पानावरील नकाशावरून समजून घेऊया.

### माहीत आहे का तुम्हांला ?


भारतीय क्षेत्रात भारताच्या मुख्य भूमीशिवाय अनेक बेटांचा समावेश होतो.

१. अरबी समुद्रातील लक्षद्वीप बेटे.
२. बंगालच्या उपसागरातील अंदमान आणि निकोबार बेटे.
३. भारताच्या मुख्य भूमीजवळील समुद्रातील बेटे.

या सर्व बेटांची स्थाने देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. महाराष्ट्राच्या किनाऱ्याच्या रक्षणासाठी यातील काही बेटांवर किल्ले बांधले गेले. हे ऐतिहासिक किल्ले जलदुर्ग म्हणून ओळखले जातात. कोकण किनारपट्टीवर असे किल्ले अनेक ठिकाणी पहायला मिळतात.



जलदुर्ग : जंजिरा




वरील नकाशाचे नीट निरीक्षण करा. या नकाशात भारतातील काही प्रमुख नगदी पिके व विविध प्रकारचे वाहतुकीचे मार्ग दाखवले आहेत.

**नकाशाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

(१) आपल्या राज्यात केशर कोठून आणावे लागेल? त्यासाठी सोईचा मार्ग गिरवा.

(२) चहाचे उत्पादन कोणकोणत्या राज्यांत होते?

(३) आपल्या राज्यात लवंग आणण्यासाठी मार्ग निश्चित करा व गिरवा.

(४) सफरचंदाचे उत्पादन भारतातील कोणकोणत्या राज्यांत होते ते शोधा. त्या राज्यांच्या नावाभोवती ○ करा.

५. नागपूरची संत्री बिकानेरला पाठवण्यासाठी मार्ग निश्चित करा व गिरवा.

६. पश्चिम बंगाल राज्यात कॉफी व आंबे पाठवण्यासाठी मार्ग निश्चित करा व गिरवा.

७. महाराष्ट्रातील कांदा अरुणाचल प्रदेश या राज्यात कोणत्या मार्गाने पाठवाल ?

## काय करावे बरे ?



हर्ष व तनिष्का मुंबईला राहतात. त्यांना अंदमान आणि निकोबार बेटे पाहायची आहेत. प्रथम ते चेन्नई येथे मामाकडे जाणार आहेत. त्यानंतर या बेटांना भेट देणार आहेत. त्या प्रवासासाठी पृष्ठ ४९ वरील नकाशात दिलेल्या मार्गांपैकी कोणते मार्ग अवलंबावे लागतील ? नकाशात हे मार्ग गिरवून तुम्ही त्यांना मदत कराल का ?

## हे नेहमी लक्षात ठेवा.



आपल्या देशातील वनस्पती, प्राणी, पक्षी, यांच्यात विविधता आहे. वनप्रदेशात गेल्यावर ती आपल्याला सहज पाहता येते. ही विविधता आपण जपली पाहिजे.

## आपण काय शिकलो ?



- भारताचे वर्णन नकाशाच्या आधारे समजून घेतले.
- भारतातील भूरूपे व जलरूपे समजून घेतली.
- भारतातील विविध भाषा, पेहराव, सण, उत्सव, वैशिष्ट्ये यांची माहिती कृतीतून समजून घेतली.
- भारतातील काही कृषी उत्पादने व वाहतुकीचे मार्ग यांची ओळख करून घेतली.

## स्वाध्याय

**१. पुढील विधानांतील चूक दुरुस्त करून विधाने वहीत लिहा.**

(अ) हिमाचल प्रदेशात कॉफीचे मळे आहेत.

(आ) कोकण प्रदेश भारताच्या पूर्व भागात आहे.

(इ) त्रिपुरा राज्य आकारमानाने सर्वांत लहान राज्य आहे.

(ई) साबरमती नदी मध्यप्रदेशातून वाहते.

(उ) सह्याद्री पर्वत आंध्र प्रदेशात आहे.

**२. पृष्ठ क्र.४४ व पृष्ठ क्र. ४७ वरील नकाशे अभ्यासा व कोणत्या नद्या कोणत्या राज्यांतून वाहतात ते वहीत नोंदवा.**

**उपक्रम**

(१) भारताच्या उत्तर सीमेवरील कोणत्याही एका घटकराज्यातील लोकजीवनाविषयी माहितीचा सचित्र संग्रह तयार करा.

(२) एकांकिका सादर करा. 'मी .... राज्य बोलत आहे.'

(३) तुमच्या परिसरात राहणारी माणसं कोणकोणत्या भाषा बोलतात त्याची माहिती घ्या. या भाषा कोणत्या राज्यांशी संबंधित आहेत ते वहीत नोंदवा.

* * *